इति.स.सा.स.दिनांक २०.०६.२०१५
कार्यक्रम पत्रिका क्रमांक - ०३

# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

## दिनांक २०-६-२०१५ रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त.

शनिवार दिनांक २० जून २०१५ रोजी (का.प.क्र .०३)मा.महापौर श्री.त्र्यंबक गणपतराव तुपे यांचे अध्यक्षतेखाली महानगरपालिकेची सर्वसाधारण सभा महानगरपालिकेच्या मुख्य कार्यालयातील कै.प्रबोधनकार केशव सिताराम ठाकरे सभागृह येथे सकाळी १०-३० वा वंदेमातरम या गिताने सुरू झाली. सभेला मा.अति.आयुक्त श्री.रमेश पवार,नगरसचिव, श्री.एम.ए.पठाण व संबधीत अधिकारी तसेच खालील प्रमाणे स.सभासद उपस्थित होते.

१. स.स. श्री. प्रमोद प्रल्हाद राठोड
२. स.स. श्री.थोरात दिलीप गंगाधर
३. स.स. श्री.जंजाळ राजेंद्र हिम्मतराव
४. स.स. श्री. खान जहाँगीर मुलानी
५. स.स. श्री.बमणे पुनमचंद सोनाजी
६. स.स. श्री. जाधव बन्सी ग्यानू
७. स.स. श्री. वाघमारे रुपचंद लक्ष्मण
८. स.स. श्रीमती ज्योती जयेश अभंग
९. स.स. श्री.राजगौरव हरिदास वानखेडे
१०. स.स. सौ. रोजतकर पुष्पा उत्तमराव
११. स.स. श्री.विजय साईनाथ औताडे
१२. स.स. श्री. सुरे सीताराम इसराम
१३. स.स. सौ. स्वाती किशोर नागरे
१४. स.स. श्री.मेघावाले मोहन धन्नुलाल
१५. स.स. श्री. खान अय्युब म.हुसेन खान
१६. स.स. श्री. जाधव ज्ञानोबा पांडूरंग
१७. स.स. श्रीमती निकाळजे आशा विजय
१८. स.स. श्री. शेजवळ सुभाष सयाजी
१९. स.स. श्री. रावसाहेब राधाकिसन आमले
२०. स.स. श्रीमती लोखंडे मनिषा विनोद
२१. स.स. श्रीमती दाभाडे प्रेमलता मिलींद
२२. स.स. श्री. अफसर खॉन यासीन खॉ
२३. स.स. श्री.कादरी जमीर अहेमद रहीम अहेमद
२४. स.स. श्री. सय्यद मतीन रशीद
२५. स.स. श्रीमती शकीला बेगम फैयाजोद्दीन
२६. स.स. श्रीमती तसनीम बेगम अ.रऊफ
२७. स.स. श्रीमती खान सायरा बानो अजमल

२८. स.स. श्रीमती सय्यद सरवतबेगम आरेफ हुसैनी
२९. स.स. श्री. सिद्दीकी नासेर तकीउद्दीन
३०. स.स. श्रीमती शेख नरगीस सलिम
३१. स.स. श्रीमती खरात सिमा गणपत
३२. स.स. सौ. शोभा नारायणराव वळसे
३३. स.स. श्री. चित्ते नितीन रमन
३४. स.स. सौ. ज्योती सुभाष पिंजरकर
३५. स.स. श्रीमती सोनवणे भारती महेंद्र
३६. स.स. श्रीमती शबनम बेगम कलीम कुरेशी
३७. स.स. श्रीमती संगिता सुभाष वाघुले
३८. स.स. श्री.मलके गोकुलसिंग संपतसिंग
३९. स.स. श्रीमती सुरेखा बाळासाहेब सानप
४०. स.स. श्रीमती वैशाली कारभारी जाधव
४१. स.स. श्रीमती खरात सुरेखा गौतम
४२. स.स. श्री. मकरंद माधवराव कुलकर्णी
४३. स.स. श्री. खान इरशाद इब्राहिम
४४. स.स. श्रीमती नसीम बी सांडु खॉ
४५. स.स. श्री.अजीम अहेमद रफीक
४६. स.स. श्रीमती साजेदा फारुखी सईद फारुखी
४७. स.स. श्रीमती खतीजा कुरैशी छोटू कुरैशी
४८. स.स. श्री.खान फेरोज मोईनुद्दीन
४९. स.स. कु.यशश्री लक्ष्मीनारायन बाखरीया
५०. स.स. श्री. तनवाणी राजु लेखराज
५१. स.स. श्री.ढगे गंगाधर नामदेव
५२. स.स. श्रीमती खान नसरीन बेगम समद यारखॉ
५३. स.स. श्रीमती किर्ती महेंद्र शिंदे
५४. स.स. श्री. एडके विकास प्रकाश
५५. स.स. श्रीमती चावरीया बबीता विजय
५६. स.स. श्री. भादवे रामेश्वर बाबुराव
५७. स.स. श्री. बल्लाळ मनोज आसाराम
५८. स.स. श्रीमती मलेका बेगम हबीब कुरैशी
५९. स.स. श्रीमती शेख समिना शेख इलियास
६०. स.स. श्रीमती पठाण अस्मा फिरदोस रफीक पठाण
६१. स.स. श्री.जायभाय रमेश भानुदास
६२. स.स. श्री. शेख जफर अखतर
६३. स.स. श्री. जहागीरदार मोहम्मद अयुब गुलाम जिलानी
६४. स.स. श्रीमती गादगे शितल विरभद्र
६५. स.स. श्री.नाईकवाडी अब्दुल रहीम शेख

६६. स.स. श्री. दांडगे शिवाजी भाऊसाहेब
६७. स.स. श्रीमती भालेराव आशा नरेश
६८. स.स. श्री. खैरे ऋषिकेश चंद्रकांत
६९. स.स. श्रीमती रेशमा अशफाक कुरेशी
७०. स.स. श्री. बारवाल गजानन रामकिसन
७१. स.स. श्रीमती बोर्डे सरीता अरुण
७२. स.स. श्रीमती वाडकर शिल्पाराणी सागर
७३. स.स. श्रीमती बनकर विजया संजय
७४. स.स. श्री.साळवी नितीन दशरथ
७५. स.स. श्रीमती विधाते अंकिता अनिल
७६. स.स. श्रीमती कुलकर्णी जयश्री सुरेंद्र
७७. स.स. श्री.वैद्य रेणुकादास (राजु) दत्तोपंत
७८. स.स. श्री.मनगटे गजानन भानुदास
७९. स.स. श्रीमती देशमुख माधुरी मिलींद
८०. स.स. श्रीमती सत्यभामा दामु अण्णा शिंदे
८१. स.स. श्री. जगताप भाऊसाहेब उत्तमराव
८२. स.स. श्रीमती नरोटे कमल रामचंद्र
८३. स.स. श्री.जगताप कमलाकर शामराव
८४. स.स. श्रीमती चव्हाण सुनिता रामराव
८५. स.स. श्री. भगवान (बापु) देविदास घडमोडे
८६. स.स. श्री.गांगवे मनोज बन्सीलाल
८७. स.स. श्री.सोहेल शकील शेख
८८. स.स. श्रीमती ज्योती सुनिल नाडे
८९. स.स. श्रीमती साळवे अनिता मोहन
९०. स.स. श्रीमती मुंढे मनिषा बाळासाहेब
९१. स.स. श्रीमती मिना रामदास गायके
९२. स.स. श्री.पवार आत्माराम माणिकराव
९३. स.स. श्रीमती मोरे ज्योती राजाराम
९४. स.स. श्रीमती विमल गोविंद केंद्रे
९५. स.स. श्रीमती चक्रनारायण सीमा काहानुलाल
९६. स.स. श्रीमती अर्चना शैलेंद्र निळकंठ
९७. स.स. श्रीमती सुमित्रा गिरीजाराम हाळनोर
९८. स.स. श्रीमती निकाळजे लता मगन
९९. स.स. श्री.सोनवणे राहुल पंढरीनाथ
१००. स.स. श्री.विकास रतनलाल जैन
१०१. स.स. श्री.सिद्धांत संजय शिरसाट
१०२. स.स. श्री.अब्दुल मं.नाविद अब्दुल रशीद
१०३. स.स. श्रीमती विमल जनार्धन कांबळे

१०४. स.स. श्री.घोडेले नंदकुमार राधाकिसन
१०५. स.स. श्रीमती मुल्ला सलीमा बेगम खाजोददीन
१०६. स.स. श्रीमती शोभा गरुलिंगअप्पा बुरांडे
१०७. स.स. श्रीमती स्मिता दिगंबर घोगरे
१०८. स.स. श्री.गायकवाड कैलास लक्ष्मण

**नामनिर्देशित पालिका सदस्य**

१. श्री.शेख अब्दुल ताहेर अब्दुल करीम
२. श्री.घोडके कचरु छगनराव
३. श्रीमती आऊलवार सुनिता तुकाराम
४. श्री.कांबळे चेतन जनार्धन

श्री.जहागींर खान :अगोदर विषय पत्रिका घेण्यात यावे.

श्री.नंदकुमार घोडेले :मा.आयुक्त उपस्थित नाही. कोणत्या कामा निमित्ताने ते गैरहजर आहे गोव्याला गेले असल्याचे पेपरच्या माध्यमातून वाचले.माहिती घ्यावी.

मा.महापौर :मा.आयुक्ताचे पत्र आलेले आहे. ते गोवा येथे अर्बन वॉटर मॅनेजमेंटच्या कार्यशाळेसाठी परवानगी घेऊन गेलेले आहे.

श्री.भगवान घडमोडे :काल आपण शहरात अनेक ठिकाणी पाहणी केली बिकट परीस्थिती असतांना कार्यशाळा महत्वाची की शहरातील नागरीक हा सुध्दा महत्वाचा विषय आहे.

मा.महापौर :शहरातील समस्या सोडविण्यासाठी महापौर व उपमहापौर आपण सर्व पदाधिकारी,अधिकारी सर्व सक्षम आहोत.

**<u>विषय क्रमांक १०:-</u>**

दिनांक १३.०१.२०१५ व १४.०१.२०१५ रोजीची विशेष सभा,(का.प.क्र-३५) दिनांक २०.०१.२०१५ (२२.१२.२०१४ ची तहकुब सभा) (का.प.क्र.३४), दिनांक २०.०१.२०१५ ची सर्वसाधारण सभा (का.प.क्र.३६) तसेच दिनांक ०३.०२.२०१५ (का.प.क्र.३७),दिनांक २०.०२.२०१५ व दि.२१.०२.२०१५ (का.प.क्र.३८),दिनांक ०२.०३.२०१५ (का.प.क्र.३९),दिनांक २३.०३.२०१५ (का.प.क्र.४०) ची सर्वसाधारण सभा व दिनांक २९.०४.२०१५ ची विशेष सभा आणि दिनांक ३०.०५.२०१५ रोजी झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त कायम करणे.

**<u>संवाद:-</u>**

श्री.सिद्दीकी नासेर :इतिवृत्तातील सर्व विषयावर चर्चा व्हावी तोपर्यंत कायम करू नये. बहुतांशी सदस्य नवीन आहेत.

मा.महापौर :इतिवृत्तांवर चर्चा करावी जी दुरुस्ती असेल ती करता येईल.

श्री.नंदकुमार घोडेले :इतिवृत्त क्रमवारी ठेवावे.

श्री.जहागींर खान :नवीन सदस्य असल्याने त्यांना यातील माहिती नाही पुढील सभेत इतिवृत्ताचा विषय घ्यावा.

श्री.भगवान घडमोडे :सरसकट इतिवृत्त मंजूर करणे योग्य नाही मागील बॉडीच्या कार्यकाळातले इतिवृत्त समोर आलेले आहे इतिवृत्तातील ठराव क्र.७८८ संदर्भात पेपरला बातम्या आहे की डीआय पाईप ऐवजी एचडीपीई पाईप

टाकणार हा विषय सभागृहात न आणता इतिवृत्तात घेतला असे होत असेल तर हा ठराव होऊ शकतो का? माहिती दयावी.

मा.महापौर :मागिल वेळच्या सभागृहाचे आपण सदस्य नव्हते ज्यांना माहित आहे ते सांगतिल हा विषय होता की नाही.

श्री.भगवान घडमोडे :आता मी या सभागृहाचा सदस्य आहे.मनपाचे नुकसान होत असेल व तसे ठराव यात असतील ते घेणार आहात का ?

मा.महापौर :सविस्तर चर्चा केली जाईल आपले म्हणणे ऐकून घेतले महापालिकेचे यात नुकसान होते का, फायदा आहे. सर्व माहिती घेवू.

श्री.भगवान घडमोडे :हा विषय इतिवृतात टाकण्यात आला नाही तर हा विषय कोठून आला कोणत्या अधिकाऱ्या मार्फत विभागाकडून आला. कार्यकारी अभियंता यांचे विभागाचे जावक रजिस्टरची प्रत घेतली हा ठराव पाठविल्याचा उल्लेख नाही.

मा.महापौर :शहर अभियंता यांनी खुलासा करावा.

श्री.रेणुकादास वैद्य :शहरातील पाण्याचा प्रश्न सुटला पाहिजे.तसेच महापालिकेचे नुकसान होऊ नये ही सर्वांची भावना आहे.

श्री.सिद्दीकी नासेर :पुर्वी घेतलेले विषय पुन्हा सभागृहा समोर यावे.जनतेला नव्याने योजनेची माहिती आम्हाला देता येईल.

श्री.अब्दुल रहीम नाईकवाडी:७० टक्के नवीन सदस्य आहे सविस्तर खुलासा घ्यावा तो पर्यंत इतिवृत्त मंजूर करू नये.

श्री.प्रमोद राठोड :इतिवृत्तात कायम करण्याचा विषय यात दिनांक ०२.०३.२०१५ रोजीच्या सभेतील ठराव क्रमांक ७८८ दिला मागिल बॉडीच्या कार्यकाळात मी सदस्य होतो. या प्रस्तावात डीआय पाईप ऐवजी एचडीपीई पाईप विषयीचा ठराव आहे ऐनवेळी ठराव घेत असतांना तो सभागृहात वाटप केला पाहिजे परंतु तसे झाले नाही. यापुर्वी दोन दिवस समांतर जलवाहिनी संदर्भात सभा झाली चर्चा झाली त्यावेळी टेंडर झाले त्याप्रमाणे डीआय पाईप वापरावे असे मा.महापौरानी आदेशीत केले होते त्यावेळचे सदस्य येथे आहे. त्या बैठकीचे इतिवृत्त सुध्दा या बरोबरच आहे असे असतांना दिनांक ०२.०३.२०१५ रोजीच्या शेवटच्या बैठकीत डीआय ऐवजी एचडीपीई पाईपचा प्रशासनाचा ठराव अचानक का आला विषय पत्रिकेवर विषय नव्हता. यास शासनाने मंजुरी दिली तर १५३ कोटीचा महापालिकेला फायदा होणार असे म्हटले समांतर बैठक झाली त्यावेळी डीआय पाईप वापरले जातील असे कार्यकारी अभियंता यांनी म्हटले. ठराव देत असतांना अधिकारी तारीख टाकत नाही. अचानक पणे हा ऐनवेळी ठराव आणला मा.आयुक्त, कार्य.अभियंता तसेच नगरसचिव यांचे आवक जावक रजिस्टरला या ठरावाची कुठेही नोंद नाही. नोंद न करता तारीख न टाकता अचानक हा ठराव आणला जातो. १५३ कोटीचा फायदा कोणाला होईल. महापालिकेचा जर फायदा होत होता तर या बाबत सविस्तर चर्चा होऊ शकली असती

डीआय पाईपचा विषय आहे सर्वांना कळाले असते ऐनवेळी हा प्रस्ताव घेण्याची घाई का केली,कुणासाठी केली,कुणी प्रस्ताव ठेवण्यास आदेशीत केले. संचिकेवर लिहिले की मागिल सर्व संदर्भ तपासून हा प्रस्ताव सादर करण्यात आला.सर्व माहिती दयावी.

श्री.रेणुकादास वैद्य :सभागृहाचा सन्मान ठेवून निवेदन की, मी सभागृहात होतो. चांगला ठराव मंजुर केला. सभागृहात आमचा सहभाग होता. डीआय पाईप बसविणार असे मागिल बैठकीत म्हटले होते. डीआय, एचडीपीई पाईप बसवायचे ही टेक्नीकली बाब आहे. नगर सेवक टेक्नीकल नाही. माझा विषय होऊ शकत नाही. शहराला पाणीपुरवठा सुरळीत व भरपूर व्हावा व महापालिकेचे नुकसानही होऊ नये. या दोन्ही गोष्टी बघीतल्या पाहिजे कोणी सांगितले प्रशासक कोणी सांगितले हा विषय होऊ शकत नाही. शहर अभियंता यांना स्वतंत्ररित्या नियुक्त केले आहे. ते टेक्नीकल आहेत. कृपया वेळ घालवू नये पाणी पुरवठा सुरळीत व्हावा.

श्री.विकास जैन :जो ठराव आहे त्यानुसारच स्थायी समितीत निर्णय झालेला आहे प्रशासनातर्फे ठेवले होते. निविदा मंजुर करतांना हे आले आहे. नवीन बाब नाही. स्थायी समितीने यास मंजूरी दिली आहे. त्याचा आधार घेऊन ठेवले आहे. आपण सर्व साक्षीदार आहोत.

श्री.भगवान घडमोडे :टेक्नीकली बाबी प्रशासन पाहतील परंतु आपण ट्रस्टी आहोत महापालिकेचे नुकसान होणार नाही हे आपण बघणे आवश्यक आहे.

मा.महापौर :महापालिकेचे नुकसान होऊ नये अशी आपली भुमिका आहे.

श्री.अब्दुल रहीम नाईकवाडी:हे सभागृह सक्षम आहे चर्चा करून योग्य निर्णय होणे अपेक्षीत आहे.

श्री.जहागींर खान :१५३ कोटीचा विषय लहान नाही. किती फायदा व नुकसान होणार सर्व माहिती घ्यावी.

श्री.मो.अय्युब जहागीरदार:पाईप कोणते असावे डीआय, एचडीपीई हा विषय नाही. ॲग्रीमेंन्ट काय झाले. पाईप का change होते. शासनाची मंजूरी केंव्हा येणार, अगोदरच काम करण्यास उशीर होत आहे. मंजूरी केंव्हा येणार नागरीकांना पाण्यासाठी भटकावे लागते पाणी मिळत नाही.

श्री.नंदकुमार घोडेले :विषयांतर होत आहे.

श्री.अफसर खान :दिनांक ०२.०३.२०१५ च्या बैठकीत मा.महापौर आपणही असाल मी ही होतो. हा १५३ कोटीचा प्रस्ताव ऐनवेळी केंव्हा आला माहीत नाही. असा प्रस्ताव घेवून कंपनीचा फायदा करीत असेल तर ही आपल्यासाठी योग्य बाब नाही. शहरात कंपनीने कोणतेही काम केले नाही किरकोळ कामे सुध्दा कंपनी करीत नाही कंपनीला दिलेले काम काढून घ्यावे. डीआय ऐवजी एचडीपीई पाईप लावण्याचा निर्णय घेतला तर या बाबतीत मा.न्यायालयात दाद मागावी लागेल. पाईप चेंज होऊ नये.

मा.महापौर :शहर अभियंता यांनी या बाबतीत खुलासा करावा.

शहर अभियंता :एचडीपीई पाईप व डीआय पाईप हे ॲग्रीमेंन्टमध्ये सुध्दा समावेश आहे. शेवटच्या सर्वसाधारण सभेच्या पूर्वीच्या सभेत समांतर जलवाहिनीवर दोन दिवस चर्चा झाली त्यावेळी स.सदस्यांचे असे म्हणणे झाले की फक्त डीआय पाईप वापरावे. त्यावेळी असा खुलासा केलेला होता की डीआय पाईप वापरण्याची निवीदेमध्ये तरतूद आहे परंतु ज्यावेळी प्रीबीड बैठक होते त्यावेळी वेगवेगळे कॉन्ट्रेक्टर, बिडर येतात ते वेगवेगळया शंका उपस्थित करतात. त्यांना आपण उत्तरे दिली हे सर्व ऑनरेकॉर्ड असते तो करारनाम्याचा भाग आहे. त्यात असे ही म्हटले आहे, की महापालिकेचे आर्थीक नुकसान होणार नसेल व केंद्र व राज्य शासन त्यास मंजुरी देणार असेल व त्यात बदल होऊन महापालिकेचा फायदा होत असेल तर डीआय व एचडीपीई पाईपचे कॉम्बीनेशन वापरण्यास हरकत नाही. हा विषय दिनांक २२.०३.११ च्या स्थायी समितीमध्ये झालेला आहे त्यावेळी श्री.राजु शिंदे स्थायी समिती सभापती होते. त्या इतिवृत्तात असे म्हटलेले आहे की निविदा अटी व शर्ती नुसार वितरण व्यवस्थेमध्ये डीआय पाईप ऐवजी Combination of HDPE + DI Pipe वापरण्यास केंद्र व राज्य शासनाकडून आवश्यक ती मान्यता प्राप्त करणे, अशा बदलामुळे महानगरपालिकेस कोणताही आर्थीक भार सोसावा न लागणे, विकासकाने द्यावयाच्या सेवा सुविधांचा स्तर हा Service Level Requirment नुसार असणे आणि शासनाने असा बदलास मान्यता न दिल्यास वितरण व्यवस्थेत फक्त DI पाईप वापरणे अशा अटीवर विकासकास वितरण वाहिन्या टाकण्यास मुभा देण्यात आली या कार्यवाहीस ही सभा मान्यता देते.स्थायी समितीने मान्यता दिली त्यानुसार करारनामा झालेला आहे.

श्री.अफसर खान :प्रस्ताव ऐनवेळी केंव्हा आला,सदस्यांना का वाटप केला नाही. ठराव कुणी आणला हा खुलासा अपेक्षीत आहे.

या वेळी अनेक स.सदस्य एकाच वेळी मोठमोठयाने बोलत असतात.

मा.महापौर :ज्या सदस्यांना माहिती पाहिजे त्यांना माहिती द्यावी.

श्री.नंदकुमार घोडेले : आधी खुलासा होऊ द्या.

श्रीमती सिमा खरात : अधिकारी जेंव्हा बोलतात तेंव्हा नगर सेवकांनी बोलू नये.

श्री.अफसर खान :आम्हाला समजते.

शहर अभियंता :हा प्रस्ताव का आणला तर जी शेवटीची सभा होती त्या सभेत अनेक स.सदस्यांनी असे मत मांडले की डीआय पाईपच वापरावे त्यावेळी मा.महापौर यांनी सदस्यांची भावना लक्षात घेता डीआय पाईप वापरावे असे म्हटले. मी त्यावेळी सांगण्याचा प्रयत्न केला परंतु ऐकण्याच्या स्थितीत सभागृह नव्हते आता हा विषय समोर आला सर्वांना माहित झाले. डीआय ऐवजी एचडीपीई पाईप बसवले असते तर चुकीचे होत आहे असे लक्षात आले असते. त्यामुळे प्रशासनाची बाजू आपल्या समोर ठेवण्यासाठी ऐनवेळी हा प्रस्ताव दिलेला होता. सभागृहाला स्पष्ट

खुलासा करतो की जो काही १५३ कोटीचा फायदा होणार तो महापालिकेला होणार आहे.

(यावेळी अनेक सदस्य एकाच वेळी बोलतात.)

श्री.अफसर खान :महापालिकेचा कसा फायदा होईल ते सांगावे.

श्री.राजगौरव वानखेडे :ऐनवेळी प्रस्ताव आलेला होता तर सविस्तर चर्चा का झाली नाही.

शहर अभियंता :HDPE + DI Pipe Combination वापरण्यास जी १५४ कोटी कॉस्ट कमी होईल महापालिकेचाच फायदा होणार आहे. UIDSSMT, JNNURM स्कीम अंतर्गत योजना केली जात असे आता केंद्रात नवीन शासन आलेले आहे. त्यांनी दोन्ही स्कीममध्ये बदल केला त्या ऐवजी नविन योजना आणल्या त्यामूळे पुढील हप्ता येईल की नाही शंका आहे. जे जे अनुदान येईल जमा होईल तेच दुसरा हप्ता म्हणून वापरता येईल ती रक्कम आपणाकडे आहे. यात AOSG जे आहे ते डीआय पाईपची कॉस्ट धरून केलेले आहे. HDPE + DI Pipe Combination चे आर्थीक गणित असेल परंतु याचा फायदा महापालिकेला होणार आहे. १५३ कोटीचा कंपनीला फायदा होणार हे धादांत खोटे आहे.

श्री.जहागींर खान :सन २०११ ला करारनामा झाला २०१५ मध्ये समोर आणला. रेल्वेस्टेशन ते भडकल गेट पर्यत ४० कोटीची लाईन होत आहे. ती रक्कम या योजनेत आहे किंवा काय? मीटर कॉस्ट ८५० असतांना ३०५० आकारणी होत असून ॲडव्हान्स रक्कम कंपनी जमा करीत असेल तर ही योजना कंपनीसाठी की नागरीकासाठी आहे. हे टेंडर सुभाष प्रोजेक्ट मार्केटीग लि.यांनी घेतले यात औरंगाबाद वॉटर युटीलिटीचे कुठे ही नाव नाही. डीआय पाईपचे करारनामा केलेला आहे. जो प्रस्ताव ठेवला तो ऐनवेळी टाकला योजनेला केंद्र व राज्य शासनाचे अनुदान मिळाले आहे शासनाची मंजुरी घेतलीका? करारनामा केला त्यात शहर अभियंता यांना अधिकार दिले. त्या कंपनीचे डायरेक्टर कोण आहे यादी समोर यावी. कपंनी कुणाची आहे वॉटर युटीलिटी कंपनीला कुणी ॲग्रीमेंन्ट करून दिले. मंजूरी घेतली होती का सर्व खुलासा करावा.

श्री.रेणुकादास वैद्य :मार्केटमध्ये ८५० रू मीटरसाठी लागणार असेल तर नागरीकांना हे आणण्याची परवानगी दयावी.

श्री.कादरी जमीर :महापालिकेकडून पाणीपुरवठा सुरळीत होत होता कंपनीकडे दिल्यापासून अनेक प्रश्न निर्माण होत आहे कंपनीच्या लोकांना सांगितलेले कळत नाही सुचनाचे पालन होत नाही. स.सदस्यांना पाणी मिळण्यासाठी टाकीवर जावून प्रतिक्षा करावी लागते. ७-७ दिवस पाणी येत नाही.ही पध्दत बरोबर नाही. यापुर्वी समांतर विशेष सभा घेतली पुन्हा विशेष सभा घेवून त्यानंतर या विषय मंजूर केला पाहिजे.

श्री.अब्दुल रहीम नाईकवाडी:स.पदाधिकारी,सदस्यांचे समातंर कंपनीचे कर्मचारी फोन घेत नाही. पाण्यासाठी नागरीकाची ओरड होते पाण्याची समस्या सोडविण्यासाठी

गेलेले एक स.सदस्य यांचेवर ३५३ नुसार गुन्हा दाखल होतो ही बाब बरोबर नाही. एजन्सीने काम घेवून १८ महिणे झाले या काळात मुस्लीम भागात कुठेही पाईप लाईन टाकली नाही.काम चालू केलेले नाही.

(यावेळी अनेक सदस्य एकाचवेळी बोलत असतात.)

श्री.नंदकुमार घोडेले :या योजनेचे काम होत असतांना कुठेच भेदभाव होत नाही.सर्व भागात कामे होणार आहे.

श्री.अब्दुल रहीम नाईकवाडी:आमच्या भागात ७-७ दिवस पाणी येत नाही. काही ठिकाणी घाण पाणी येते नागरीकांचे आरोग्य धोक्यात आहे.

श्रीमती खान सायरा बानो: शहागंजच्या टाकीवरून माझ्या वार्डात ९ दिवसापासून पाणी आले नाही आता रमजान महिणा सुरू आहे. विचारणा केली असता कंपनीकडे जावे असे उत्तर मिळते ही पध्दत बरोबर नाही. कंपनी काही भागात २ दिवस तर काही भागात ९ दिवसानंतर पाणी देत आहे कंपनीने कोणतेही काम सुरू केले नाही. पवित्र रमजान महिना सुरू आहे दोन दिवसा आड पाणी पुरवठा करावा. त्यांचेसह काय करारनामा केला यापेक्षा पाणी पुरवठा वेळेवर व सूरळीत होते हे महत्वाचे आहे.

श्री.नंदकुमार घोडेले :इतिवृत्ताचा विषय मंजूर करावा.

श्री.घडमोडे भगवान :सविस्तर चर्चा केल्याशिवाय इतिवृत्त मंजूर करू नये.

श्री.नंदकुमार घोडेले :नळाचे मीटर कंपनीकडून बसविण्याची सक्ती करू नये समातंरचे काम पुर्ण होत नाही तसेच पाणीपुरवठा सुरळीत होत नाही तोपर्यत संमातर एजन्सीकडे असलेले वसुलीचे काम थांबवावे.हा विषय मंजूर करावा.

श्री.राजगौरव वानखेडे :महापालिकेचा फायदयाचा विषय होता तर ऐनवेळी ठेवून त्यावर चर्चा का केली नाही. DI पाईप बद्दल असे काय झाले, एसडीपीई पाईप चांगले तर मागच्या सभेत का नाही समोर आले. तीन महिण्यानंतर काय प्रकार घडला हा विषय ऐनवेळी इतिवृत्तात घेतला मी मागील बॉडीच्या सभागृहात होतो. हा प्रस्ताव आलेला नव्हता?

मा.महापौर :माईक खराब आहे आवाज येत नाही.शहर अभियंता यांनी पुढील सभेपर्यंत माईकमध्ये स्पष्ट आवाज येईल अशी व्यवस्था करावी तसेच एका टेबलवर दोन माईक बसवावे.

श्री.गजानन बारवाल :समांतर जलवाहिनीच्या संदर्भात मा.महापौर, मा.आयुक्त, तसेच सुकाणू समितीची व अधिकाऱ्या बरोबर अनेकदा बैठका झाल्या परंतु HDPE पाईप बसवावे चर्चा झालेली नाही झाली असेल तर केंव्हा झाली.

श्री.भगवान घडमोडे :स्थायी समितीमध्ये हा विषय झाला असेल,महापालिकेला याचा फायदा होणार असे म्हटले परंतु हे सभागृह महत्वाचे नाही का ? सभागृहासमोर विषय का आला नाही चर्चा झाली नाही. फायदा प्रशासनच करू शकते का? या सभागृहाला महत्व नाही का नागरीकांनी सदस्यांना निवडून दिले ते याची चिंता करणार नाही का ? ठराव कोणी

सादर केला. मा.आयुक्त, कार्य.अभियंता, नगरसचिव विभागाचा आवक जावक रजिस्टरच आहे त्यात कुठेही ठराव ठेवल्या बाबतची नोंद नाही. महापालिकेच्या फायदयाचा ठराव होता तर सभागृहाला अधांरात ठेवण्याचे कारण काय ? मागिल इतिवृत्त वाचले तर असे लक्षात येईल की डीआय पाईप वापरणार असे म्हटले आहे सर्व खुलासा करावा.

श्री.भाऊसाहेब जगताप :अनेक सदस्यांची भावना की २.३.१५ च्या बैठकीत हा प्रस्ताव नव्हता ऐनवेळी टाकण्यात आला. HDPE पाईप टाकल्याने १५३ कोटीचा महापालिकेचा फायदा होत होता तर सभागृहात विषय का वाटप केला नाही.वार्डात ८-८ दिवस पाणी येत नाही कंपनीचे लोक याकडे दुर्लक्ष करतात.या बाबत निर्णय घ्यावा.

श्री.नंदकुमार घोडेले :प्रशासनाच्या वतीने या विषयावर खुलासा झालेला आहे. हा विषय ऑलरेडी त्या सभेत मंजूर झालेला आहे.इतर विषय बाकी आहे. इतिवृत्त कायम करायचे आहे. दुरूस्तीसह मंजूरी दयावी.

श्री.भगवान घडमोडे :यावर चर्चा व्हावी. इतिवृत्त मंजूर केले तर आम्हाला मा.न्यायालयात दाद मागावी लागेल.

श्रीमती संगिता वाघुले : वार्ड क्र.३४ मिसारवाडी भागात गेल्या २५ वर्षापासून पाईप लाईन टाकली नाही. आंबेडकर नगर पर्यत लाईन टाकलेली आहे. पाण्याचा प्रश्न बिकट होत आहे. तो सोडवावा.

श्री.नंदकुमार घोडेले :महापालिकेच्या फायदयाचा विषय आहे. मंजूर करावे.

श्री.राजगौरव वानखेडे :या वर मतदान घेण्यात यावे.

श्री.गजानन बारवाल :मतदान घेण्यात यावे.

(या वेळी अनेक स.सदस्य डायस समोर उभे राहून एकाच वेळी मोठमोठयाने बोलत असतात.)

मा.महापौर :सर्व सदस्यांनी आपआपल्या जागेवर बसावे.

श्री.अफसर खान :यावर मतदान घ्यावे.

मा.महापौर :प्रशासनाचा खुलासा झालेला आहे.यात महापालिकेचाच फायदा होणार आहे. सर्वसाधारण सभेपुढे असलेले इतिवृत्त कायम करण्यात येते.

**<u>ठराव:-</u>**

दिनांक १३.०१.२०१५ व १४.०१.२०१५ रोजीची विशेष सभा,(का.प.क्र-३५) दिनांक २०.०१.२०१५ (२२.१२.२०१४ ची तहकुब सभा) (का.प.क्र.३४), दिनांक २०.०१.२०१५ ची सर्वसाधारण सभा (का.प.क्र.३६) तसेच दिनांक ०३.०२.२०१५ (का.प.क्र.३७),दिनांक २०.०२.२०१५ व दि.२१.०२.२०१५ (का.प.क्र.३८),दिनांक ०२.०३.२०१५ (का.प.क्र.३९),दिनांक २३.०३.२०१५ (का.प.क्र.४०) ची सर्वसाधारण सभा व दिनांक २९.०४.२०१५ ची विशेष सभा आणि दिनांक ३०.०५.२०१५ रोजी झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्तांत कायम करण्यास मंजुरी देण्यात येते.

**<u>प्रश्नोत्तरे:-</u>**

मा.महापौर : आता प्रश्नोत्तरे घेण्यात येते नगर सचिव यानी प्रश्न पुकारावे.

नगर सचिव :स.सदस्य श्री.कैलास लक्ष्मण गायकवाड यांनी क्र.१ ते ४ प्रश्न विचारलेले आहे.

श्री.कैलास गायकवाड :८-१० दिवसांपुर्वी मी प्रश्न दिलेले आहे विषय पत्रिकेसोबत आहे सर्वांना विषयपत्रिका मिळाली मुख्यलेखाधिकारी संदर्भात चार प्रश्न दिले. सभेच्या किमान तीन दिवस अगोदर उत्तर दयायला पाहिजे होते ते मला मिळाले नाही आस्थापना विभाग प्रमुखाचे हे काम होते माहिती दिली नाही त्यामुळे त्यांना सभागृहाच्या बाहेर पाठवावे.

मा.महापौर :खुलासा द्यावा.

उपआयुक्त (म) :दिनांक १८.०६.२०१५ रोजी स.सदस्यांना उत्त्तर दिलेले आहे.

श्री.कैलास गायवाकड :मला उत्तर मिळाले नाही.उपआयुक्त दिशाभूल करीत आहे.

मा.महापौर :केंव्हा पाठविले होते.कशा पध्दतीने पाठविले जाते सर्व माहिती दयावी.

उपआयुक्त (म) :मिळाले किंवा नाही, हे मला माहित नाही. परंतु या विभागाकडून उत्तर गेलेले आहे.

आस्थापना अधि.१ :दिनांक ११.६.२०१५ रोजी प्रश्नाचे उत्तर पाठविले आहे ते का मिळाले नाही १० मिनिटात माहिती घेवून सांगण्यात येईल.

श्री.रेणुकादास वैद्य :सभेची सुचना ७ दिवस अगोदर निघते विषय पत्रिकेवर विषय असतात ज्या त्या अधिका-या सर्व माहितीसह सभागृहात यायला पाहिजे.

आस्थापना अधि.-१ :स.सदस्य यांना उत्तर पोहचणे अपेक्षीत होते १० मिनिटात माहिती घेवून खुलासा केला जाईल.

श्री.कैलास गायकवाड :७ दिवस अगोदर प्रश्न दिला आहे. १० मिनिटे मागत आहे यांचेकडे उत्तर नाही. खोटे बोलत आहे सभागृहाच्या बाहेर पाठवावे.

मा.महापौर :उत्तर का पोहचले नाही १० मिनिटाचा वेळ देण्यात येतो माहिती घ्यावी.

श्री.कैलास गायकवाड :तीन दिवस उत्त्तर अगोदर मिळत नसेल तर अभ्यास केंव्हा करणार सभागृहात प्रश्न मांडणार कसा?याचा अर्थ अधिका-यांना पाठीशी घालण्याचा प्रयत्न दिसून येतो.

श्री.भगवान घडमोडे :जबाबदार अधिकारी सांगतात मला माहित नाही हे बरोबर नाही.

मा.महापौर :उपआयुक्त म श्री.बोर्डे यांचे कडून असे उत्तर अपेक्षीत नाही यापुढे असा प्रकार होऊ नये नोंद घ्यावी. काय उत्तर पाठविले ते वाचून दाखवावे.

आस्थापना अधिकारी-१:स.सदस्य श्री.कैलास गायकवाड यांनी विचारलेले प्रश्न व उत्तरे खालीलप्रमाणे आहेत.

| प्र.क्र | प्रश्न | उत्तर |
|---|---|---|
| १. | श्री.अशोक थोरात, मुख्य लेखाधिकारी यांची महानगरपालिकेत स्वियेत्तर सेवेतंर्गत महानगरपालिकेवर नियुक्ती केव्हा झाली. | शासन वित्त विभागाचे आदेश क्र.संलेको-२०१२/प्र.क्र.१०५/२०१२/कोषा.प्रशा-२ दि.१३ जून, २०१२ अन्वये श्री.अशोक थोरात, कोषागार अधिकारी यांची औरंगाबाद महानगरपालिकेच्या मुख्य लेखाधिकारी या पदावर बदलीने पदस्थापना करण्यात आलेली असून त्यांना दि.१४/६/२०१२ रोजी मध्यान्हानंतर रुजू करुन घेण्यात आले आहे. |

| | | |
|---|---|---|
| २. | त्यांच्या प्रतिनियुक्तीस मा.महासभेची मान्यता कलम ५३(१) नुसार घेण्यात आली होती काय? ती मुदतवाढ किती कालावधीसाठी होती, आदेश क्र. व ठराव क्र. | मा.सर्वसाधारण सभेने ठराव क्र.७९५ दि.२०/६/२०१२ अन्वये श्री.अशोक थोरात, मुख्य लेखाधिकारी यांना दि.१४/६/२०१२ रोजी रुजू झाल्याच्या तारखेपासून एक वर्षाच्या प्रतिनियुक्ती कालावधीस मान्यता दिलेली आहे. |
| ३ | त्यांची मुदतवाढ जर एक वर्षासाठी असेल तर त्यास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील तरतुदीनुसार पुन:श्च घेण्यात आलेली आहे काय? असल्यास त्या आदेशाची प्रत पुरवावी, नसल्यास मान्यता घेण्याची जबाबदारी कुणाची होती, त्यांचेविरुध्द कार्यवाही काय करण्यात आली. | नाही. यापुर्वी श्री.सु.अ.पेडगांवकर,उप आयुक्त(महसूल) यांचे प्रतिनियुक्तीस मुदतवाढ देणेबाबत प्रकरण सादर करण्यात आले होते. तथापि, तत्कालिन आयुक्त यांनी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ४५(ब) मधील तरतुदीनुसार शासनाने प्रतिनियुक्तीवर पाठविलेल्या अधिकाऱ्यांच्या प्रतिनियुक्तीच्या मुदतवाढीचे प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेसमोर सादर करण्याची आवश्यकता नसल्याचे निर्देश दिले होते. त्यामुळे जुलै-२०१३ नंतर श्री.अशोक थोरात, मुख्य लेखाधिकारी यांचा मुदतवाढीबाबतचा प्रस्ताव सर्वसाधारण सभेसमोर ठेवण्यात आलेला नाही. सद्यस्थितीत श्री.अशोक थोरात, मुख्य लेखाधिकारी यांच्या बदली/प्रतिनियुक्ती संदर्भाने मा.उच्च न्यायालयात प्रकरण न्यायप्रविष्ट आहे. |
| ४. | सर्वसाधारण सभेचे मान्यता नसल्यामुळे श्री.अशोक थोरात, मुख्य लेखाधिकारी यांची सध्याची नेमणूक कायद्यास धरुन आहे काय? | |

श्री.अफसर खान :प्रकरण न्यायप्रविष्टअसेल तर त्या संदर्भात प्रश्न व उत्तर मागवू शकतो का त्यावर चर्चा करता येते का ?

श्री.कैलास गायकवाड :एक वर्षासाठी श्री.थोरात यांना मुदतवाढ दिली त्यानंतर ची मुदतवाढ घेणे आवश्यक आहे की नियमात काय आहे सचिवांचा खुलासा घ्यावा.

मा.महापौर :विधी सल्लागार यांनी खुलासा करावा.

विधी सल्लागार :श्री.थोरात यांचे मुदतवाढ व प्रतिनियुक्ती बाबत प्रश्न उपस्थित केला या संदर्भात मा.उच्च न्यालयामध्ये श्री.संजय पवार यांनी महाराष्ट्र शासन व महापालिकेचे मुख्यलेखाधिकारी श्री.थोरात यांचे विरुध्द रिट याचिका क्र.१४६८/१५ दाखल केली आहे हे प्रकरण न्यायप्रविष्ट आहे. मा.उच्च न्यायालयाचा मान राखून प्रकरण न्यायप्रविष्ट असेल तर त्या बाबत असे प्रश्न व त्यावर चर्चा करणे योग्य नाही.

श्री.कैलास गायकवाड :श्री.थोरात यांना मुदतवाढ देवू नये अशी रिट याचिका दाखल झाली का?

श्री.रेणुकादास वैद्य :मा.न्यायालयाचा आम्ही मान राखतो परंतु न्यायालयात प्रकरण आहे हे दाखवून कोणतीच कार्यवाही करायची नाही हे बरोबर नाही.

श्री.भगवान घडमोडे :मुदतवाढीसाठी कोणत्या नियमाने प्रस्ताव आणता येत नाही खुलासा घ्यावा.

श्री.कैलास गायकवाड :श्री.थोरात यांना एक वर्षासाठी परवानगी दिली त्यानंतर मुदतवाढीचा प्रस्ताव आलेला नाही हा सभागृहाचा अवमान आहे.ज्यांनी हा प्रस्ताव ठेवला नाही त्यांचेवर शिस्तभंगाची कार्यवाही करावी.

मा.महापौर :तीन दिवस स.सदस्यांना त्यांचे प्रश्नाचे उत्तर देणे अपेक्षीत होते यापुढे असे होऊ नये १० मिनिटात स.सदस्य यांना उत्तराची प्रत दयावी. या प्रकरणी प्रकरण न्यायपविष्ट असल्याने चर्चा करणे योग्य नाही.

श्री.कैलास गायकवाड :मा.न्यायालयाचा सन्मान करतो परंतु श्री.थोरात यांचा मुदतवाढीचा प्रस्ताव आणू नये असे कोर्टाने म्हटलेले नाही.यात ज्यांनी कसूर केला त्यांचेवर शिस्तभंगाची कार्यवाही करावी.

मा.महापौर :कोणकोणते अधिकारी प्रतिनियुक्तीवर आहे कोणाला मुदतवाढ दिली नाही पुढील बैठकीत माहिती ठेवावी.अधिकारी यांना ताकीद दिली यापुढे असे होऊ नये.

**<u>विषय क्रमांक ११ :-</u>**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, महानगरपालिकेच्या सिध्दार्थ जलतरण तलावात दिनांक ०९.०५.२०१५ रोजी मोहंमद हबीब माझ हा युवक पोहत असतांना अपघाताने पाण्याखाली गेला होता. तरी त्याचा उपचारासाठी साई हॉस्पीटल समर्थनगर मध्ये दाखल केले होते. तरी त्याची अवस्था गंभीर आहे आणि पुढील उपचारासाठी बजाज हॉस्पीटल येथे स्थलांतरीत करण्यात आले आहे. तसेच संबंधीत मोहंमद हबीब माझ हा कक्षा बारावीचा विद्यार्थी आहे आणि त्याचे वडील सध्या बेरोजगार आहे. उपचारासाठी खर्च झेपू शकत नाही. तसेच महानगरपालिकेच्या जलतरण तलावात सदरील घटना घडलेली असल्याने संबंधीतास उपचाराचा झालेल्या प्रत्यक्ष वैद्यकीय खर्च महानगरपालिकेतर्फे अदा करण्यात यावा.

करीता प्रस्ताव मा.सर्व साधारण सभेपुढे मंजुरीस्तव सादर.

**सुचक :-** श्रीमती सायरा बानो अजमल खान **अनुमोदक :-** श्री. नितीन दशरथ साळवी.

श्री.रेणुकादास वैद्य :देण्यास हरकत नाही. ऑडीट ऑब्जेक्शन येते. चौकशी करतात. अडचण होते. अशा प्रकरणात किती आर्थीक मदत करायची प्रशासनाने नियमानुसार ठरवावे.

श्रीमती सायरा बानो : ७ मे २०१५ रोजी सकाळी मोहंमद हबीब माझ नावाचा मुलगा सिध्दार्थ जलतरण तलावामध्ये ३ मिनीट ४५ सेकंद तरंगत होता. तेथे कोणी अथॉरेटी नव्हते का? खातरजमा आपल्या कर्मचाऱ्यांनी केली नाही. ही दुसरी घटना आहे. फुटेज मध्ये सर्व चित्र आलेले आहे. त्यानंतर त्यास सायन हॉस्पीटमध्ये दाखल केले. श्वासोश्वासावर उपचार केले. आता बजाज हॉस्पीटलमध्ये आहे. ९ लक्ष रूपये उपचारावर खर्च झाला तो देण्यात यावा. त्याचे वडील सेवानिवृत्त शिक्षक आहे. त्यांचेकडे पैसे नाही. ३५ वर्षे सेवा केलेली आहे.

श्री.गजानन बारवाल :किती मदत दयायचे ते ठरवावे परंतु संबधीत व्यक्ती तेथील सदस्य होते का?

श्रीमती सायरा बानो :त्याचे रजिस्ट्रेशन आहे. (नोंदणीचे कागदपत्रे दाखवतात.)

श्री.अफसर खान :आर्थीक मदत दयावी तसेच जे व्यवस्थापन आहे ते दुर्लक्ष करत असेल तर त्यांना तेथून हटवावे.दुस-यांची नियुक्ती करावी.

श्री.गंगाधर ढगे :यापुर्वी हर्सुल तलावात चार मुलाचा पाण्यात बुडून मृत्यू झाला त्यांचे कुटूंबीयांना आर्थीक मदत देण्याचा ठराव घेतला एक वर्ष झाले अदयाप कार्यवाही केली नाही.त्यांच्या कुटूंबीयांनाही आर्थीक मदत करावी.

श्री.जहागींर खान :परवाच्या पावसात एन-६ येथील नाल्यात एक युवक वाहून जात त्यांचा मृत्यू झाला त्यांस एक अपंग बहीन आहे. संबधीताच्या कुटूंबीयासही आर्थीक मदत करावी.

श्री.जमीर कादरी :हर्सुल तलावात मृत्यू झालेल्याच्या कुटूंबीयांना मदत देण्याचा ठराव मंजूर केला एक वर्ष झाले अंमलबजावणी केली नाही.

श्री.नंदकुमार घोडेले :जलतरण तलाव वर सदस्य नोंदणी करतांना पॉलीसी (विमा काढणे)घेणे बंधनकारक करावे.

मा.महापौर :संबधीताच्या वैद्यकीय खर्च देण्याचा हा प्रस्ताव आहे.नियमानुसार आर्थीक मदत देत असतो परंतु विशेष बाब म्हणून जास्तीत जास्त आर्थीक मदत करण्यात यावी.तसेच हर्सुल येथील तलावात ४ मुलाचा मृत्यू झाला त्यांना आर्थीक मदत देण्याचा ठराव घेतला त्या बाबतीत काय कार्यवाही केली त्यांची माहिती दुपारनंतर माझ्याकडे देण्यात यावी.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे महानगरपालिकेच्या सिध्दार्थ जलतरण तलावात दिनांक ०९.०५.२०१५ रोजी मोहंमद हबीब माझ हा युवक पोहत असतांना अपघाताने पाण्याखाली गेल्याने औषधोपचार घेत आहेत. त्याच्या औषधोपचारासाठी प्रत्यक्ष झालेला खर्चाचा विचार करुन विशेष बाब म्हणुन जास्तीत जास्त आर्थिक मदत महानगरपालिकेतर्फे अदा करण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक १२ :-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, जालना रोडवरील मोंढा नाका येथील उड्डाणपुलाचे काम सध्या प्रगतीपथावर आहे. येत्या दोन महिन्यात या पुलाचे लोकार्पण होऊन सदरील पुल नागरिकांसाठी खुला होणार आहे.

या उड्डाणपुलास “छत्रपती संभाजी राजे” उड्डाण पूल असे नाव देण्यात यावे.

करीता प्रस्ताव सर्वसाधारण सभेच्या मान्यतेस्तव सादर.

सुचक :- श्री. नितीन दशरथ साळवी, श्रीमती अंकीता अनिल विधाते.

अनुमोदक :- श्री.बल्लाळ मनोज आसाराम, श्रीमती आशा नरेश भालेराव.

श्री.नंदकुमार घोडेले :यात सुचक व अनुमोदक म्हणून काही स.सदस्यांची नावे नमूद करावी.

मा.महापौर :विषय मंजुर. या प्रस्तावात श्री.रेणुकादास वैद्य, श्री.नंदकुमार घोडेले, श्री.राजेंद्र जंजाळ, श्री.विकास जैन यांचे अनुमोदक म्हणुन नावे टाकावीत.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे जालना रोडवरील मोंढा नाका येथे उभारण्यात येत असलेल्या उड्डाणपुलास “छत्रपती संभाजी राजे” उड्डाण पूल असे नाव देण्यास तसेच या प्रस्तावात

अनुमोदक म्हणुन श्री.रेणुकादास वैद्य,श्री.नंदकुमार घोडेले, श्री.राजेंद्र जंजाळ,श्री.विकास जैन यांची नावे टाकण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

श्री.रामेश्वर भादवे :मोंढा नाका कडून उड्डाण पुलाकडे जातांना शेडचे अतिक्रमण झालेले आहे ते काढण्यात यावे.

मा.महापौर :प्रशासकीय अधिकारी यांनी कार्यवाही करावी.

**विषय क्रमांक १३:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की औरंगाबाद शहराचे पोलिस आयुक्त श्री. अमितेशकुमार यांनी औरंगाबाद शहरातील रस्त्यावरील अतिक्रमणे काढुन औरंगाबाद शहरातील रस्ते मोकळे केले या कामाबध्दल त्यांचा अभिनंदनाचा प्रस्ताव मंजुरीस्तव सादर. तसेच हे काम महापालिकेचे असुन येणा-या काळात मनपा आयुक्तांनी अतिक्रमणा बाबत दक्ष राहून कठोर कार्यवाही करावी.

करिता प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

सुचक:- श्री. राजेंद्र हिम्मतराव जंजाळ. अनुमोदक:- श्री. कमलाकर शामराव जगताप.

श्री.राजेंद्र जंजाळ :शहरातील अनेक भागातील अतिक्रमणे मा.पोलीस आयुक्ताच्या नियत्रंणाखाली पोलीस विभागाने काढलेले आहे ते काम महापालिकेचे होते. अभिनंदनाचा ठराव पारीत करावा. यापुढे अतिक्रमणे होणार नाही याकडे महापालिकेने लक्ष दयावे व हा विषय मंजूर करावा.

श्री.अब्दुल रहीम नाईकवाडी:रस्त्यावर असलेले हातगाडी वाले यांना तंबी दिली जाते परंतु अनेक दुकान मालकाने रस्त्यावर शेड बांधले त्या बाबतीत तक्रार केली कार्यवाही होत नाही. प्रशासकीय अधिकारी यांचेकडे तक्रार केली असतां नगररचना विभागाचे आदेश आणावे असे सांगतात. प्रशासकीय अधिकारी यांचे काम काय आहे रस्त्यावर शेड बांधलेल्यावर कार्यवाही करावी.

श्री.गजानन बारवाल :शहरातील हातगाडया टपऱ्या हटविल्या मा.पोलीस आयुक्तांनी हे चांगले काम केले. अतिक्रमण असेल तर काढले पाहिजे. प्रशासकीय विभाग हे काम का करीत नाही. ज्याचे हातगाडया,टपऱ्या काढल्या त्यांना पर्यायी जागा देण्याचा सहानुभूतीपुर्वक विचार करावा.

श्री.मो.अय्युब जहागीरदार:अतिक्रमण हटविणे हे महापालिकेचे काम असतांना मा.पोलीस आयुक्त यांनी कार्यवाही केली. ही चांगली बाब आहे. दु:ख वाटते की हेच काम महानगरपालिकेतील आपले अधिकाऱ्यांनी केले असते तर त्यांचे अभिनंदन केले असते. तसेच वाटर युटीलिटी कंपनी सोबत मा.पोलीस आयुक्त यांनी बैठक घेतली. हे काम महापालिकेचे आहे.परंतु पोलीस विभागाला पहावे लागत आहे.

मा.महापौर :पाण्याची टंचाई निर्माण होऊन काही अनुचित प्रकार घडू नये म्हणून पोलीस आयुक्तांनी बैठक घेतली होती.महापालिकेचे काम महापालिकाच करीत आहे.

श्री.अब्दुल रहीम नाईकवाडी:अनेक रस्त्यावरील हातगाडया, टेम्पो टपऱ्या हटविल्या ते लोक २५-२५ वर्षापासून त्या जागेवर व्यवसाय करतात शहरात पार्कीगची व्यवस्था नाही भाजीमंडई नाही,मटन मार्केट नाही. जेथे मोठे शापींग

कॉम्प्लेक्स आहे, महापालिकेच्या जागा असतील तेथे या लोकांना पर्यायी जागा दिल्या पाहिजे. या लोकांना व्यवसायही मिळेल व कचरा,घाण एकाच ठिकाणी संकलन होईल.

श्री.भगवान घडमोडे :या ठरावानुसार अभिनंदन करत आहोत. आपले प्रशासन काहीच करीत नाही. महापालिकेने अतिक्रमण काढायला पाहिजे. कारणे पुढे करून कार्यवाही करीत नाही. पोलीस विभागाची मदत घेवून महापालिकेचे अतिक्रमण होणार नाही याची दखल घेण्याचे आदेशीत करावे. मा.पोलीस आयुक्त यांचे सर्वांच्या वतीने अभिनंदन करावे.

श्री.नंदकुमार घोडेले :हा ठराव आणला आनंदाची बाब आहे. परंतु महापालिकेच्या विभागाने अतिक्रमणाची कार्यवाही केली असती तर मा.पोलीस आयुक्त यांना ही कार्यवाही करण्याची वेळ आली नसती आपला विभाग अकार्यक्षम होत आहे. शहरातील वाढते अतिक्रमण,होत असलेले बाधकाम यावर अतिक्रमण विभागाचे नियत्रंण नाही. इ.निरीक्षक बांधकाम होत असलेल्या ठिकाणी जातात पाहणी करतात. संबधीतांना नोटीस देतात पुढे कार्यवाही होत नाही. कार्यपध्दतीत सुधारणा करणेची गरज आहे. अनेक डी पी रोडवर अतिक्रमण होत आहे. आरक्षीत जमिनीवर घरे होत आहे यामूळे भविष्यात गुंठेवारीचा प्रश्न निर्माण होतो व तेथे सोयी सुविधा दयायच्या की नाही प्रश्न पडतो. अनधिकृत बांधकाम करण्याचे अतिक्रमण काढण्याचे कुणी नगरसेवकाने थांबविले तर रेकॉर्डवर आणावे. स.श्री.वैद्य व स.श्री.जंजाळ यांनी आणावे. भागातील स्वतःहून अतिक्रमण काढायला लावले. नाल्याच्या जागेवर अतिक्रमण होऊन नाले अरूंद होत आहे. नाल्याची रुंदी जागेवर नाही दुर्दैव? विभाग कार्यक्षम करणेचे गरजेचे आहे आत्मपरीक्षणाची वेळ आली. हा प्रस्ताव मंजूर करावा.

श्री.रेणुकादास वैद्य :मा.पोलीस आयुक्त यांनी शहरातील अतिक्रम हटविले. अभिनंदनास्पद बाब आहे. महापालिकेचे काम त्यांनी केले. २२ दिवसापासून रोज सकाळी ११ वाजता श्री. झनझन यांना मी वार्डातील अतिक्रमण काढण्या विषयी फोन केले.ही कार्यवाही केवळ पोलीस विभागावर टाकून होणार नाही. त्यावर श्री.झनझन यांनी हे शहर १५ लक्ष लोकसंख्येचे आहे. दोन कर्मचारी घेवून काम करू शकत नाही.इतर विभागाचे त्यांचे काम चांगले आहे. अग्निशमन विभागात ते चांगले काम करता पावसाळयाचे दिवस आहे माझ्या वार्डात अनेक लोकांच्या घरात पाणी गेले. २०-२० कॉल वेटींगला आहे म्हणून अग्निशमनची गाडी आली नाही. श्री.झनझन यांचेकडे जास्त कामाचा भार आहे  त्यांचेकडील प्रशासकीय विभागाचा चार्ज दुस-या अधिका-याकडे देण्यात यावा.

श्री.मो.अय्युब जहागीरदार:पावसाची पाणी वाडयात/घरात येऊ द्या. नंतर येऊ असे उत्तर मिळते.

मा.महापौर : मंजुर.

श्री.विकास जैन : लेखी पत्र पाठवा.

श्री.शेख अब्दुल ताहेर :विषय पत्रिका १६ तारखेला मिळाली सात दिवस अगोदर मिळावी तसेच मी प्रश्न दिलेला होता तो सात दिवस अगोदर न दिल्याने विषयपत्रिकेवर आलेला नाही. शहराचे नाव उंचावयाचे असेल तर रस्ते चांगले केले पाहिजे. पर्यटक येण्याचे कमी झाले असे वृत्तपत्रात आले शहरातील रस्ते खराब असल्यामूळे भारतातच नव्हे तर आंतर राष्ट्रीय पातळीवर हे खड्डयाचे शहर असल्याचे बोलले जाते शहराची प्रतिमा चांगली ठेवायची असेल तर रस्ते अगोदर चांगले करावे.

श्री.जहागींर खान :अभिनंदनाचा ठराव ठेवला मंजूर करावा परंतु शहरात मोठे नाल्याच्या साइडला अतिक्रमण झाल्याने नाले अरूंद झाले यापुढे अतिक्रमण काढण्याचे काम कोण करणार आहे. श्री.झनझन यांचेकडे अनेक विभागाचे चार्ज दिले त्यामूळे याकडे दुर्लक्ष होते. उपआयुक्ताकडे या विभागाचे काम दयावे. नाल्यावर अतिक्रमण केले ते काढावे.

श्री.राजेंद्र जंजाळ :अतिक्रमण काढणे बाबत पत्र दिले कार्यवाही होत नाही. त्यामूळे पोलीस विभागाला हे काम करावे लागते. आता पुन्हा हातगाडया लागणार नाही याची दखल मनपाने घ्यावी.

श्री.चेतन कांबळे :औरंगाबाद शहरातले जे ५२ दरवाजे आहे त्यातील प्रमुख बारापुल्लागेट, पाणचक्की गेट, व मकईगेट तसेच लोखंडी पुल या पुलाची स्थिती बीकट आहे. केंव्हा ही ते ढासाळू शकते. बारापुल्ला गेटच्या साईडचे काम केले पुन्हा त्या जागेवर अतिक्रमण होत आहे ते काढले दुरुस्ती होणार का?

मा.महापौर :मा.पोलीस आयुक्त यांचे मार्फत अतिक्रमण काढण्याची कार्यवाही होत असतांना महापालिकेचे अधिकारी सुध्दा बरोबर होते. चांगला ठराव आहे. शहागंज,भाजीमंडई जवळील तसेच गजानन महाराज मंदीर रस्त्यावरील व शहरातील इतर अतिक्रमणे काढली पाहिजे याची महापालिका प्रशासनाने दखल घ्यावी. ज्या ठिकाणचे अतिक्रमण काढले तेथे पुन्हा अतिक्रमण होऊ नये यासाठी एक पथक नेमावे हा ठराव मंजूर करण्यात येतो.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे औरंगाबाद शहराचे पोलिस आयुक्त श्री. अमितेशकुमार यांनी औरंगाबाद शहरातील रस्त्यावरील अतिक्रमणे काढुन औरंगाबाद शहरातील रस्ते मोकळे केले या कामाबध्दल त्यांचा अभिनंदनाचा प्रस्तावास मंजुरी देण्यात येते.वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक १४:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, जालना रोडवरील सिडको बसस्टॅण्ड जवळील कै.वसंतराव नाईक चौकात उभारण्यात येत असलेल्या उड्डाणपुलाचे काम सध्या प्रगतीपथावर आहे. या उड्डाणपुलास स्वातंत्र्यवीर सावरकर उड्डाण पूल असे नाव देण्यात यावे.

करीता प्रस्ताव सर्वसाधारण सभेच्या मान्यतेस्तव सादर.

सुचक :- श्री.नितीन दशरथ साळवी, श्री.रामेश्वर बाबुराव भादवे.

अनुमोदक:-श्री.बल्लाळ मनोज आसाराम, श्रीमती चक्रनारायण सीमा काहानुलाल, श्रीमती मोरे ज्योती राजाराम, श्रीमती गायके मिना रामदास.

श्री.नितीन साळवी :विषय मंजूर करावा.

श्री.गंगाधर ढगे :या उड्डाण पुलास डॉ.बाबासाहेब आंबेडकर किंवा डॉ. रफिक झकेरिया यांचे नाव देण्यात यावे.

मा.महापौर :विषयपत्रिकेवर हा विषय आलेला आहे यानंतर महानगरपालिकेचे एकाचे मोठे काम असेल पुलाचे काम असेल त्यास सुचविलेल्या नाव देण्याचा नक्कीच विचार करण्यात येईल.हा विषय मंजूर

श्री.भगवान घडमोडे :या प्रस्तावात श्रीमती सत्यभामा शिंदे,श्री.प्रमोद राठोड,श्रीमती राखी देसरडा यांचे प्रस्तावात अनुमोदक म्हणुन नावे टाकावीत.

मा.महापौर :तसेच श्री.रेणुकादास वैद्य, श्री.नंदकुमार घोडेले, श्री.राजेंद्र जंजाळ, श्री.विकास जैन यांचेही अनुमोदक म्हणुन नावे टाकावीत.या दुरुस्तीसह विषय मंजूर.

**<u>ठराव:-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे जालना रोडवरील सिडको बसस्टॅण्ड जवळील कै.वसंतराव नाईक चौकात उभारण्यात येत असलेल्या उड्डाणपुलास स्वातंत्र्यवीर सावरकर उड्डाण पूल असे नाव देण्यास तसेच श्रीमती सत्यभामा शिंदे, श्री.प्रमोद राठोड, श्रीमती राखी देसरडा श्री.रेणुकादास वैद्य, श्री.नंदकुमार घोडेले, श्री.राजेंद्र जंजाळ, श्री.विकास जैन यांची अनुमोदक म्हणुन नावे टाकण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्रमांक १५ :-</u>**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, एन-६ सिडको माता मंदिर येथे परवाच्या पावसामध्ये कलीम सलीम शेख हा मुलगा कामाच्या निमित्त जात असतांना नाल्यातील पुलावरून वाहुन गेला त्यातच त्याचा मृत्यु झाला.त्याच्या आई-वडिलांचा देखिल मृत्यू झाला असुन त्याला अपंग बहीण असुन ती पुर्णत: निराधार झालेली आहे.त्याला उपजीविकेचे कोणतेही साधन नाही.तरी त्याबध्दल सहानुभूतीपुर्वक विचार करुन दिवंगत शेख कलीम शेख सलीम याच्या कुटूंबाला कमीत कमी २ लक्ष रुपये (अक्षरी दोन लाख) आर्थीक मदत देण्याचा प्रस्ताव सर्वसाधारण सभेच्या मान्यतेसाठी प्रस्ताव सादर.

सुचक : श्री. नाईकवाडी अब्दुल रहिम शेख अनुमोदक : श्रीमती खान सायरा बानो अजमल

श्री.गजानन बारवाल :जास्तीत जास्त आर्थीक मदत करावी.

श्री.खान फेरोज मोईनोद्दीन: ४ फुटाची नाली आठ दिवसापासून ओपन होती त्यात या व्यक्तीचा पाय घसरून मृत्यू झाला यास महापालिका प्रशासन दोषी आहे अधिका-यावर कायदेशीर कार्यवाही करावी.व या व्यक्तीच्या कुटूंबीयास जास्तीत जास्त मदत देण्यात यावी.

श्री.अब्दुल रहिम नाईकवाडी:श्री.कलीम शेख हा गरीब कुटुंबातीत व्यक्ती होता किराडपूरा येथे तो कामासाठी जात असे. मोठा पाऊस पडला पावसाचे पाणी नालीमध्ये आले किराडपूरा ते बजरंग चौक असा जाण्याचा त्याचा मार्ग होता एन-६ भागात मोठमोठे नाल्या बांधलेल्या आहे नालीवर ढापे नसल्याने व पाणी वाहत असल्याने पाणी किती खोलवर आहे याचा अंदाज त्यास

आला नाही त्यामूळे पाय घसरून नालीत गेला यात महापालिकेचे दुर्लक्ष झाले नालीवर ढापे टाकायला पाहिजे होते १० फुटावर एक ढापा त्यामूळे त्या ठिकाणी अपघात झाला व यानंतरही होऊ शकतो.संबधीत व्यक्तीचा अपघाती मृत्यू झाला त्यांचे कुटूंबीयास भेटण्याची तसदी मनपाचे संबधीत अधिकारी यांनी घेतली नाही.या व्यक्तीस एक अपंग बहीण आहे त्यास आई वडील नाही.तिचे पालन पोषण करणारे कुणी नाही. सहानुभूतीपुर्वक विचार करून त्यांचे कुटूंबास २ लक्षची आर्थीक मदत दयावी.

श्रीमती रेशमा कुरैशी :श्री.कलीम शेख यांना आई वडील नाही आजी-आजोबा आहे त्याची एक बहीण अपंग आहे घरात कुणी कमविता नाही. त्यामुळे त्यांचे कुटूंबीयास १५ लक्षची आर्थिक मदत करावी.यात मनपाची चुक आहे नाल्याची साफसफाई केली नाही.नालीवर ढापे टाकलेले नव्हते त्यामूळे घसरून नाल्यात फसवून त्यांचा मृत्यू झाला.

श्री.अब्दुल रहिम नाईकवाडी:जास्तीत जास्त मदत करावी.

श्री.जहागींर खान :कलीम शेख याची अपंग बहीण आहे आर्थीक मदत देणे ऐवजी त्याचे बहीणीस महापालिकेमध्ये नोकरी देण्यात यावी.

श्री.भगवान घडमोडे : अपघात झालेला आहे दुर्देवी घटना घडली यात प्रशासनाचा हलगर्जीपणा आहे नियमानुसार कार्यवाही करून योग्य ती आर्थीक मदत दयावी.

श्री.राजेंद्र जंजाळ :सहानुभूतीपुर्वक विचार करून जे नियमात असेल त्यानुसार मदत करावी.

मा.महापौर :विशेष बाब म्हणुन जास्तीत जास्त आर्थिक मदत करण्यात यावी.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे एन-६ सिडको माता मंदिर येथे पावसामध्ये कलीम सलीम शेख हा मुलगा कामाच्या निमित्त जात असतांना नाल्यातील पुलावरून वाहुन गेल्याने त्याचा मृत्यु झाला असुन सहानुभूतीपुर्वक विचार करुन दिवंगत शेख कलीम शेख सलीम याच्या कुटूंबाला विशेष बाब म्हणुन जास्तीत जास्त आर्थिक मदत करण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक १६:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, दिनांक ११ नोव्हेंबर २०१४ रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेत ठराव क्रमांक ६५७ महानगरपालिकेतील लेखाधिकारी संजय पवार यांच्याकडील लेखाधिकारी पदाचा कार्यभार काढणे व एल.बी.टी. विभागाचा अतिरिक्त कार्यभार काढून घेण्यास सभागृहाने मान्यता दिलेली आहे. सर्वसाधारण सभेने ठराव पारीत केलेला असतांना प्रशासनाने सहा महिन्याच्या कालावधीत ठरावाची अंमलबजावणी केलेली नाही. ही बाब सभागृहाचा अवमान करणारी आहे असे वाटते.

सर्वसाधारण सभेने ठराव क्र.६५७ अन्वये घेतलेल्या निर्णयाची अंमलबजावणी तात्काळ करण्यात यावी. करीता प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

सुचक:- श्री.राजगौरव हरिदास वानखेडे. अनुमोदक:-श्री.विजय साईनाथ औताडे.

श्री.राजगौरव वानखेडे :११ नोंव्हेबर २०१४ रोजी श्री.संजय पवार यांचेकडील लेखाधिकारी पदाचा कार्यभार काढणे बाबत ठराव घेतला सहा महिणे झाले कार्यवाही केली नाही.या संदर्भात पत्रही दिले खुलासा मिळालेला नाही.

श्री.अफसर खान :श्री.संजय पवार यांचे प्रमाणेच इतर अधिका-याकडे विविध विभागाचा अति.कार्यभार आहे.एकाच अधिका-यांचा चार्ज काढण्याचा ठराव का येतो ही प्रशासकीय बाब आहे प्रशासन त्याचे काम करील.कार्यवाही करायची असेल तर ज्यांचेकडे अति.कार्यभार दिलेला आहे सर्वाकडील कार्यभार काढून घ्यावा एकाच अधिका-याकडील चार्ज काढणे आवश्यक वाटत नाही.

श्री.गजानन बारवाल :ठराव क्रमांक ६५७ ची अंमलबजावणी का केली नाही. असा ठराव आहे.

उपआयुक्त (म) :श्री.संजय पवार यांचेकडील एलबीटीचा चार्ज काढण्या बाबत ठराव झालेला आहे त्याची अमंलबजावणी केली नाही खरे आहे. सभागृहाच्या भावना मा.आयुक्त यांचे पर्यत पोहचल्या जातील त्यानंतर योग्य ती कार्यवाही केली जाईल.

श्री.रेणुकादास वैद्य :अंमलबजावणी का झाली नाही?

श्री.गजानन बारवाल :प्रशासन अंमलबजावणी करणार की नाही.

श्री.अफसर खान :सर्वच अधिकारी यांचेकडील अतिरिक्त चार्ज काढावे.

श्री.भगवान घडमोडे :कार्यवाही का होत नाही सर्वाचे मत झाले. अनेक जेष्ठ सदस्य येथे आहे. असे ठराव ठेवून प्रशासन त्यांचे काम करण्यास यशस्वी होत आहे प्रस्ताव येतो चर्चा होते काहींचा होकार काहीचा नकार यातून प्रशासन चार्ज काढणार नाही. अधिकारी राजकारण करतात असे ठराव येत असतांना मी एकाच्या मागे दुसरा दुसऱ्याच्या असे सदस्यांनी कदापी समजून घेवू नये.अधिकारी पोस्टचे असतात कुणाचे नसतात.सदस्यांना मिसगाईड करतात. अधिकाऱ्यांचे राजकारण वेगळे असते.अशा वेळी प्रशासनाचे उत्तर सुध्दा संयुक्तीक असावे.

श्री.राजेंद्र जंजाळ :सर्वसाधारण सभेने घेतलेल्या ठरावावर का कार्यवाही झाली नाही?

अतिरिक्त आयुक्त :लेखाधिकारी संदर्भात माहिती घेतली विधी सल्लागार यांनी खुलासा केल्यानुसार यांनी हा विषय न्याय प्रविष्ट असल्यामुळे चर्चा होऊ नये.

मा.महापौर :प्रशासनाने नियमानुसार कार्यवाही करावी.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे दिनांक ११ नोव्हेंबर २०१४ रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेत ठराव क्रमांक ६५७ संदर्भात प्रशासनाने अंमलबजावणी करणे बाबत नियमाप्रमाणे योग्य ती कार्यवाही करण्यास मंजुरी देण्यात येते.वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक १७:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की,प्रभाग क्र.४० गणेशनगर परिसरात महानगरपालिकेतर्फे हिंदूह्रदयसम्राट बाळासाहेब ठाकरे बॉटनिकल गार्डन एन-८ जवळ बांधण्यात आलेले आहे. सदर गार्डनचा उपयोग एन-८ च्या मागील व एन-७ मधील वयोवृध्दांना घेता येत नाही. त्यांना

बॉटनिकल गार्डन मध्ये जाण्यायेण्यासाठी लांबून फिरुन यावे लागते. या गार्डनचा लाभ या परिसरातील सर्व वयोवृध्द नागरीक व महिलांना येणे शक्य व्हावे यासाठी या गार्डनच्या मागील बाजूस वॉचमनच्या रुमशेजारी पायी जाणे-येणे साठी एक छोटे गेट बांधण्यात यावे.

करिता "बॉटनिकल गार्डनच्या मागील बाजूस गेट बांधणे" व त्यासाठी योग्य ती आर्थिक तरतुद आगामी अर्थसंकल्पात करणे बाबतचा प्रस्ताव सर्वसाधारण सभेपूढे मान्यतेस्तव सादर.

सुचक:- श्री.मकरंद माधवराव कुलकर्णी अनुमोदक:-श्री.शिवाजी भाऊसाहेब दांडगे.

| | |
|---|---|
| श्री.गजानन बारवाल | :असेच सर्व विषय घेवून अर्थसंकल्पात तरतुद करणार काय? लवकरात लवकर अर्थसंकपावर बैठक आयोजित करावी.बजेट मंजूर करावे. |
| श्री.मकरंद कुलकर्णी | :या ठिकाणी येण्यासाठी जेष्ठ नागरीकांना लांबून पायी फिरून यावे लागते.या ठिकाणी पायी येण्यासाठी रस्ता ठेवण्यात यावा. |
| मा.महापौर | : विषय मंजूर, बजेट मध्ये तरतूद करण्यात यावी. |

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे प्रभाग क्र.४० गणेशनगर परिसरात महानगरपालिकेतर्फे हिंदूह्रदयसम्राट बाळासाहेब ठाकरे बॉटनिकल गार्डन एन-८ येथील मागील बाजूस वॉचमनच्या रुम शेजारी एन-८ एन ७ येथील वयोवृध्दांना पायी जाणे-येणे साठी छोटे गेट बांधण्यास व यासाठी आगामी अर्थसंकल्पात तरतूद करण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

## ऐनवेळचे विषय

**विषय क्रमांक १८:**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील उपआयुक्त संवर्गाचे रिक्त असलेले पद पदोन्नतीने भरण्याबाबत दि.११.०६.२०१५ रोजी निवड समितीची बैठक संपन्न झाली. सदर बैठकीत सेवा ज्येष्ठता, शैक्षणिक अर्हता, गोपनीय अहवालाची प्रतवारी, अनुभव इ. तपासणी करुन निवड समितीने श्री. अय्युबखान नूरखान पठाण यांची खुल्या प्रवर्गातून 'उपआयुक्त' या पदावर वेतनश्रेणी रु.१५६००-३९१०० ग्रेड वेतन रु.५४००/- मध्ये पदोन्नती देणेबाबत शिफारस केली. सदरचे पद संविधानिक स्वरुपाचे असल्यामुळे महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ४५ च्या शिफारशीनुसार सर्वसाधारण सभेची मान्यता घेऊन शासनाची मान्यता घेणे नियमाप्रमाणे आवश्यक आहे.

सबब, श्री.अय्युबखान नूरखान पठाण यांना उपआयुक्त पदावर पदोन्नती देण्याबाबतचा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेसमोर मान्यतेस्तव सादर.

**संवाद:-**

| | |
|---|---|
| मा.महापौर | :नगरसचिव यांनी विषय वाचून दाखवावा. |
| नगरसचिव | :पुरवणी विषयपत्रिके सोबत हा विषय वितरीत केला आहे.(विषय वाचून दाखवतात) |
| श्री.अफसर खान | :विषय मंजूर करावा. |
| श्री.रेणुकादास वैद्य | :यापुर्वी पदोन्नती देण्या बाबतचे सर्वसाधारण सभेत अनेक ठराव मंजूर केले त्याची अंमलबजावणी केली का? किती प्रकरण प्रंलबीत आहे. श्री.डी.पी.कुलकर्णी यांचाही ठराव पारीत झालेला आहे. सर्वसाधारण सभेने घेतलेला ठरावावर तसेच श्री.डी.पी.कुलकर्णी,श्री.अय्युब खान यांचे ठरावावर तात्काळ कार्यवाही करावी. |

श्री.गजानन बारवाल :डि.पी.सी.ने या एकाच ठरावाची शिफारस केली की आणखी काही ठराव यायचे आहे.किती प्रस्ताव प्रलंबीत आहे.

श्री.घडमोडे भगवान :हा महत्वाचा विषय असून सुध्दा ऐनवेळी घेत आहोत.आपण सभागृहाचे सर्वोच्च आहात. महापालिकेच्या हिताचे निर्णय घेतो. वार्डात ड्रेनेजचे चोकअप काढण्याचे काम होत नाही नागरीकांना पाणी नाही साफसफाई होत नाही. पाण्यासाठी सदस्यांना टाकीवर जावे लागते पोलीस केसेस होत आहे. एवढया समस्या असतांना हा ठराव आणण्याची घाई का झ ाली. प्रस्ताव मंजूरीस विरोध नाही परंतु शहरातील समस्याकडे दुर्लक्ष करून यासाठी एवढी घाई का होते किती कर्मचा-यांचे प्रमोशन थांबलले आहे.

(या वेळी अनेक स.सदस्य एकाच वेळी बोलत असतात.)

श्री.नंदकुमार घोडेले :विषय सोडून वेगळी चर्चा होत आहे. मंजूर करावे.

श्री.भगवान घडमोडे :किती अधिका-याचे प्रमोशन थांबले कितीनां दयायचे प्रलंबीत आहे. या पदासाठी कोणी सिनीयर आहे का?

श्री.गजानन बारवाल :मंजूर करावे परंतु माहिती दयावी.

मा.महापौर :प्रशासनाने खुलासा करावा.

उपआयुक्त (म) :या पदासाठी जेष्ठतेनुसार सहाय्यक आयुक्त श्री. जरारे होते त्यांनी लिहून दिले की मी हे काम करण्यास समर्थ नाही त्यामूळे खालच्या अधिका-यांना पदोन्नती देण्यात आली.

मा.महापौर :ज्यांना प्रमोशन दयायचे असे किती कर्मचारी अधिकारी आहे त्याचांही विचार करावा कुणावरही अन्याय होऊ नये हा विषय स्विकृतीसह मंजूर करण्यात येतो.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील उपआयुक्त संवर्गाचे रिक्त असलेले पद पदोन्नतीने भरण्याबाबत निवड समितीने सेवा ज्येष्ठता, शैक्षणिक अर्हता, गोपनीय अहवालाची प्रतवारी, अनुभव इत्यादी तपासणी करून शिफारस केल्यानुसार श्री. अय्युबखान नूरखान पठाण यांना खुल्या प्रवर्गातून ‘उपआयुक्त’ या पदावर वेतनश्रेणी रु.१५६००-३९१०० ग्रेड वेतन रु.५४००/- मध्ये पदोन्नती देण्यास स्विकृतीसह मान्यता देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक १९:**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील कार्यकारी अभियंता संवर्गाचे रिक्त असलेले पद पदोन्नतीने भरण्याबाबत दिनांक ११.०६.२०१५ निवड समितीची बैठक संपन्न झाली. सदर बैठकीत सेवाज्येष्ठता, शैक्षणिक अर्हता, गोपनीय अहवालाची प्रतवारी, अनुभव व इ.तपासणी केली असता, शासनमान्य महानगरपालिका सेवा भरती नियमामध्ये कार्यकारी अभियंता या पदाची अर्हता स्थापत्य अभियांत्रिकी मधील पदवी/पदविका अशी आहे. तथापि, कार्यकारी अभियंता या पदाकरीता पदोन्नतीसाठी पात्र असलेले श्री.पी.आर.बनसोडे हे विद्युत पदविका धारक आहेत.

त्यामूळे कार्यकारी अभियंता या पदावर पदोन्नती देण्यासाठी शैक्षणिक अर्हता ही स्थापत्य/विद्युत/ यांत्रिकी मधील पदवी/पदविका अशी दुरूस्ती करण्यासाठी मा.सर्वसाधारण सभेची मान्यता घेऊन शासनाकडे प्रस्ताव पाठविणे आवश्यक आहे. तसेच वरील प्रमाणे अर्हतेमध्ये दुरूस्तीस शासनाची मान्यता मिळाल्यानंतर पदोन्नती देणे योग्य होईल. त्यामुळे शासन मान्यतेनंतर श्री.पी.आर.बनसोडे, उपअभियंता यांची अनुसूचित जाती प्रवर्गातून कार्यकारी अभियंता या पदावर वेतनश्रेणी रु.१५६००-३९१०० ग्रेड वेतन ६६००/- मध्ये पदोन्नती देण्याबाबत समितीने सर्वानूमते शिफारस केली आहे.

सबब महानगरपालिकेच्या सेवाभरतीमध्ये कार्यकारी अभियंता या पदाच्या शैक्षणिक अर्हतेमध्ये उक्त प्रमाणे दुरूस्तीस शासनाच्या मान्यतेनंतर श्री.पी.आर.बनसोडे,उपअभियंता यांना कार्यकारी अभियंता (ड्रेनेज व विद्युत) या पदावर पदोन्नती देण्याबाबतचा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेसमोर मान्यतेस्तव सादर.

<u>संवाद :-</u>

श्री.नंदकुमार घोडले :येत्या ३० तारखेला संबधीत अधिकारी श्री. बनसोडे हे सेवानिवृत्त होत आहे. अत्यंत कार्यक्षम व सर्वांना समजून घेणारे ते अधिकारी आहेत. संबधीत अधिकारी यांना पुढील दोन वर्ष या महापालिकेत सेवा करण्यासाठी मुदतवाढ दयावी तसा प्रस्ताव राज्य शासनाकडे विशेष बाब म्हणून पाठवावा व शासनाकडून मंजूरी येण्यास उशीर होत असेल तर त्यांना शासनाच्या मंजूरीस अधिन राहून पुढील २ वर्षासाठी कायमस्वरूपी नियुक्ती दयावी व तसा प्रस्ताव राज्य शासनाकडे पाठविण्यास प्रशासनाला आदेशीत करावे.

श्री.रेणुकादास वैद्य :श्री.बनसोडे यांनी चांगले काम केले आहे. केंव्हाही ते महापालिकेच्या कामासाठी उपलब्ध असतात. प्रस्ताव मंजूर करावा तसेच नगर सचिव श्री.एम.ए.पठाण हे सुध्दा पुढील महिण्यात सेवानिवृत्त होत आहे. त्यांना सुध्दा ०२ वर्षासाठी पुढील मुदतवाढ दयावी तसे या प्रस्तावात समावेश करावे.

श्री.गजानन बारवाल :कार्य.अभियंता पदावर पदोन्नतीचा प्रस्ताव मंजूर करावा. त्यांना मुदतवाढ देणे बाबत योग्य निर्णय घ्यावा.

श्री.नंदकुमार घोडेले :सेवा निवृत्तीची कार्यवाही सुरू केली असेल ती सुध्दा थांबविण्याचे आदेशीत करावे.श्री.बनसोडे यांना मुदतवाढ देण्याकरीता सर्वांचे समर्थन आहे.

श्री.अफसर खान :श्री.बनसोडे यांचे प्रमाणे श्री.एम.ए.पठाण नगर सचिव यांना ही दोन वर्षापर्यतची मुदतवाढ दयावी.

श्री.विकास जैन :श्री.पी.आर.बनसोडे व श्री.एम.ए.पठाण साहेब यांचे बाबतीत २ वर्षे मुदतवाढ देण्याचा चांगला निर्णय घेतला, परंतु त्या पदावर पदोन्नतीने खालचे अधिकारी नियुक्ती होणार असतात. त्यासाठी या पदाच्या खालचे अधिकारी तयार करून त्यांनाही प्रमोशन दयावे. श्री.पी.आर.बनसोडे यांचे खालचे पदावर अधिकारी नेमावे तसेच

उपनगर सचिव पदावर अधिकारी यांची नेमणूक करावी. त्यांनाही मानसन्मान दयावा. जेणे करून हे अधिकारी पुढे काम करू शकतील.

श्री.जहागींर खान मुलानी:श्री.पी.आर बनसोडे तसेच श्री.एम.ए.पठाण साहेब यांना मुदतवाढ देणे संबधी प्रस्ताव मांडला त्यास अनुमोदन आहे.

श्री.राजेंद्र जंजाळ :यास अनुमोदन आहे.मंजूर करावे.

मा.महापौर :विषय क्र.१९ हा श्री.बनसोडे यांना कार्य.अभियंता या पदावर पदोन्नती देण्याचा विषय आहे. त्यांना शासनाच्या मान्यतेस अधिन राहून पदोन्नती देण्यास स्विकृतीसह मान्यता देण्यात येते. तसेच सभागृहात झालेल्या चर्चेनुसार त्यांना दोन वर्ष मुदतवाढ देणेस मंजुरी देण्यात येते. तसेच श्री.एम.ए.पठाण नगर सचिव हे सुध्दा पुढील महिन्यात सेवानिवृत्त होत आहे. त्यांनी अत्यंत चांगली सेवा केली. त्यांना पुढील दोन वर्षासाठी मुदतवाढ देण्यास मंजूरी देण्यात येते. तसेच उपनगर सचिव पदावर हे पद भरण्याची कार्यवाही करावी.

**<u>ठराव :-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील कार्यकारी अभियंता संवर्गाचे रिक्त असलेले पद पदोन्नतीने भरण्याकरीता प्रस्तावात नमुद केलेल्या अर्हतेमध्ये दुरूस्तीस शासनाची मान्यतेस अधिन राहून श्री.पी.आर.बनसोडे, उपअभियंता यांची अनुसूचित जाती प्रवर्गातून कार्यकारी अभियंता (ड्रेनेज व विद्युत) या पदावर वेतनश्रेणी रु.१५६००-३९१०० ग्रेड वेतन ६६००/- मध्ये पदोन्नती देण्यासाठी स्विकृतीसह या प्रस्तावास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

२) सभागृहात झालेल्या चर्चेनुसार श्री.पी.आर.बनसोडे यांना दोन वर्ष मुदतवाढ देणेस सर्वानुमते स्विकृतीसह मंजुरी देण्यात येते.

३) श्री.एम.ए पठाण नगरसचिव हे सुध्दा पुढील महिन्यात जुलै-२०१५ अखेर सेवानिवृत्त होत आहे. महानगरपालिकेस त्यांच्या सेवेची आवश्यकता असल्यामुळे त्यांना पुढील दोन वर्षासाठी नगर सचिव म्हणुन मुदतवाढ देण्यास सर्वानुमते स्विकृतीसह मान्यता देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>चर्चा</u>**

मा.महापौर :पाणी पूरवठा व साफसफाईवर ३०-३० मिनीटे चर्चा होईल.

श्री.अब्दुल रहिम नाईकवाडी :सन १९९० पासून साफसफाईसाठी कर्मचारी होते तेवढेच आहे. माझ्या वार्डात १४ सफाई कामगार असल्याने पुर्ण साफसफाई होत नाही ३० कर्मचारी आवश्यक आहे शहरात अनेक ठिकाणी रस्त्यावर मातीचे ढीग, रेती पडलेली दिसते ते काढण्यात यावे.

श्रीमती सत्यभामा शिंदे :पाणीपुरवठा,कचरा उचलण्याचे काम खाजगी संस्थेला दिले जाते यावर प्रशासनाचे नियत्रंण नाही. २९ तारखेपासून औषध फवारणी सुरू केली एन-२ ठाकरेनगर भागात औषध फवारणी होत नाही. वार्डात फवारणी केल्याची स.सदस्यांची स्वाक्षरी घेत नाही.

श्री.सिताराम सुरे :सुरेवाडी जुना वार्ड क्र.२ यात आता तीन वार्ड झाले सफाई कर्मचारी संख्या तेवढीच आहे माझ्या वार्डात ०८ कर्मचारी आहे नियमानुसार २४

सफाई कर्मचारी आवश्यक आहे. ५०० लोकसंख्येमागे एक सफाई कर्मचारी देणे आवश्यक आहे ते अदयाप दिलेले नाही. तसेच वार्डात ०२ रिक्षा कचरा नेण्यासाठी देण्यात याव्यात तसेच वार्डात औषध फवारणी व्हावी. पावसाळयाचे दिवस असून आरोग्य धोक्यात. त्रास होत आहे.

श्री.राजगौरव वानखेडे :वार्ड अधिकारी यांना मजूर देण्याची मागणी केली.दिले नाही. वार्डात घंटागाडी नाही. वार्डातील लोकसंख्या १०००० असून ३ लेबर काम करतात घनकचरा प्रमुख यांना विचारणा केली असता लेबर रूजू झाले नाही उत्तर मिळाले. यापुर्वी वार्ड अ अंतर्गत बचतगटाचे कर्मचारी काम करीत होते. बजेट नसल्यामूळे ते बंद केले कळाले. वार्डात मोठया प्रमाणात कचरा साचलेला दिसून येतो  लेबर कमी आहे साफसफाई होत नाही रमजानचा महिना सुरू झालेला आहे. महापालिकेचे लेबर दयावे नसता बचतगटाच्या मार्फत लेबर पुरवविण्यात यावे.

श्री.पुनमचंद बम्हणे :दैनिक वेतनावर काम करणारे कर्मचारी यांना दोन महिण्यापासून वेतन का मिळाले नाही. खुलासा घ्यावा.

श्री.अजिम अहमद :१००० लोकसंख्येमागे दोन कर्मचारी १० हजार लोकसंख्या असेल तर २० कर्मचारी असणे आवश्यक आहे. माझ्या वार्डात ८ कर्मचारी साफसफाई करतात किमान १५ ते १८ कर्मचारी व कचरा उचलण्यासाठी लोंडीग रिक्षा  देण्यात यावे

श्रीमती शोभा बुरांडे :संग्रामनगर उड्डाण पुलाचे काम सहा महिण्यापासून चालू आहे नागरीकांना जाण्यास पर्यायी रस्ता नाही वार्डातील कचरा उचलला जात नाही एकच गाडी आहे तसेच पाणीपुरठा सुरळीत होत नाही.

श्रीमती आशा निकाळजे :वार्ड १३ मध्ये ३ महिला व ७ पुरूष सफाई कर्मचारी आहे हे कर्मचारी कमी पडतात वार्डातील पुर्ण कचरा उचलला जात नाही.

श्री.सुभाष शेजवळ :वार्ड क्रमांक १४-१५ भाग हा पुर्वी एकत्रित होता आता दोन वार्ड झाले माझ्या वार्डात लेबर कमी आहे वार्ड अधिकारी यांचेकडे मागणी कर्मचारी दिले नाही. अतिरिक्त कामासाठी रु.५०,०००/- मिळाले परंतु या भागात ते दिले नाही. तसेच वार्डात लोडींग रिक्षा कचरा वाहून नेण्यासाठी देण्यात याव्यात.

श्रीमती भारती सोनवणे :वार्ड अधिकारी व वार्ड अभियंता हे कार्यालयात बसत नाही. तसेच आंबेडकरनगर भागातील ड्रेनेज लाईन खराब झाली ती दुरूस्त करावी.

श्रीमती विधाते अंकिता अनिलः वार्डातील कचरा जमा होतो तो नियमित उचलला जात नाही. आता पावसाळा सुरू झाला कचरा साचल्याने दुर्गधी पसरते. नागरीकांच्या तक्रारी येत आहे. एक लोंडीग रिक्षा पुर्ण वार्डासाठी आहे तसेच मजूराची संख्या कमी आहे. मजुरांची संख्या व कचरा वाहून नेण्यासाठी वाहन पुरवावे.

श्रीमती मुंढे मनिषा :जयभवानीनगर वार्ड ९१ मध्ये नाला सफाई न केल्यामूळे पावसाचे पाणी लोकांच्या घरामध्ये जाते. तसेच वार्डातील साफसफाई होत नाही मजूर कर्मचारी वाढवून दयावे.

श्रीमती संगिता वाघुले :दीड वर्षापुर्वी मयुरपार्क ते जाधववाडी व पुढे पीसादेवी पर्यत ड्रेनेजचे काम केले पुढे काम थांबलेले आहे.आता पावसाळयात लोकांच्या घरामध्ये पाणी जातें वार्डात कचरा उचलला जात नाही २ लेबर पुर्ण साफसफाई करीत नाही.

श्रीमती मिना गायके :शिवाजी महाराज पुतळा ते गणपती मंदीर पर्यत रस्त्यावरील कचरा पडून असतो साफसफाई होत नाही. वार्ड अधिकारी यांना प्रत्यक्ष दाखवले.

श्री.गोकुळसिंग मलके :नारेगाव येथील कचरा डेपो मुळे तेथील नागरीकाचे आरोग्य धोक्यात आले त्या बाबतीत काय कार्यवाही करणार आहेत.

श्री.नंदकुमार घोडेले :पर्यटनाची व मराठवाडयाची राजधानी असेलेले शहर आहे देश विदेशातून पर्यटक येतात. ४५० ते ५०० टन कचरा या शहरातून निघतो त्यातील ३५० टन कचरा उचलला जातो अनेक भागात कचरा पडून असतो. काही वार्डात लेबर कमी तर काही ठिकाणी जास्त सर्व वार्डात समान लेबर देण्याचे आदेशीत केले होते परंतु कार्यवाही होत नाही. माझ्या वार्डात ९ लेबर होते २ लेबरची बदली त्यांनी करून घेतली वार्ड अधिकारी यांची परवानगी न घेता दुसरीकडे रूजू झाले. नगरसेवक सकाळी ५-६ वाजता वार्डात फिरतात परंतु साफसफाई बाबत अधिकारी यांना चिंता वाटत नाही. पेपरला स्वच्छते बाबत व पाणीपुरवठया बाबत वेगवेगळया बातम्या येतात. स्वच्छतेवर वर्षाला १०९ कोटी खर्च होतो रॅमकी कंपनीला काम दिले निघून गेले खाजगीकरणाचा अनुभव आला. १६६० कर्मचारी त्यात १२०० कर्मचारी स्वीपर म्हणून आहे. सफाई मजूर कमी आहे.स्वीपर एखादे शौचालय साफ करतात निघून जातात त्यांना सफाईचे काम देण्याची आवश्यकता आहे. मा.सर्वोच्च न्यायालयाचे निर्देशानुसार कचरा वाहतुक करतांना ताडपत्री टाकून बंद करून नेली पाहिजे. प्लॅस्टीक बकेट देऊन घरोघरी जाऊन कचरा उचलण्याची कार्यवाही करावी तसेच नारेगाव येथील कचरा डेपो बाबत कार्यवाही करावी. तेथे जे साहित्य आवश्यक आहे ते देण्यात यावे.

श्री.अदुल मं.नाविद :राहुलनगर, सादातनगर हा १० हजार लोकसंख्या असलेला वार्ड आहे येथे घंटागाडी नाही,लोडींग रिक्षा नाही तसेच ८ मजूर आहे आणखी वाढवून दयावे.

श्रीमती लता निकाळजे :एकनाथनगर वार्डात कचरा उचलला जात नाही सफाई कामगार वाढवून दयावे. या वार्डात नालीमध्ये मोठी घाण साचलेली आहे ती काढण्याची कार्यवाही करण्याचे आदेशीत करावे.

श्री.अफसर खान :माझ्या वार्डातील नाल्यामधील कचरा काढला जात नाही या संदर्भात कार्य.अभियंता,कनिष्ठ अभियंता व वार्ड अधिकारी यांना कळविले कार्यवाही केली नाही. तसेच हायड्रोलिक मशीनने कचरा उचलण्यासाठी

गाडी येत नाही. वार्ड अधिकारी यांना वारवांर फोन करूनही कार्यवाही करीत नाही.

मा.महापौर :आताच कचरा उचलणे, स्वच्छतेच्या संबधी सभागृहात ज्या ज्या सुचना स.सदस्यांनी मांडल्या त्या संदर्भात संबधीत अधिकारी यांनी तातडीने कार्यवाही करावी.

या बरोबर आजची सभा राष्ट्रगिताने संपल्याचे मा.महापौर यांनी घोषित केले.

(महबुबखॉ पठाण)
नगर सचिव
महानगरपालिका औरंगाबाद.